अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र





नवश्या गणपती, गंगापूर रोड

गणपती बाप्पा मोरया



## श्री गणेश चतुर्थी

निमित्त सर्वांना

मनःपूर्वक शुभेच्छा...!


वर्ष ४८ वे

अंक ९ वा

१० सप्टेंबर २०२६

किंमत १ रुपया




**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक**

## पावन स्वर आयोजित

# भाग्येश मराठे

यांचा शास्त्रीय, उपशास्त्रीय
गायनाचा कार्यक्रम

रविवार, दि.२० सप्टेंबर, २०२६ रोजी
सायंकाळी ६ वाजता

स्थळ : बापये सभागृह, परशुराम भवन,
सी.बी.एस. नाशिक.



अल्प परिचय :

**संगीत परंपरा व शिक्षण :** भाग्येश मराठे यांचा जन्म समृद्ध संगीतमय घराण्यात झाला असून ते भारतीय शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक, 'संगीत भूषण' पं. राम मराठे यांचे नातू आहेत. भाग्येश यांनी वयाच्या सुरुवातीला त्यांचे वडील पं. संजय मराठे यांच्याकडून संगीताचे प्राथमिक धडे घेतले. त्यानंतर त्यांनी हुबळी (कर्नाटक) येथील डॉ. गंगूबाई हंगल गुरुकुलमध्ये पं. केदार बोडस यांच्याकडे संगीताचे प्रगत शिक्षण घेतले. तिथे त्यांना ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर आणि भेंडीबाजार घराण्याची तालीम मिळाली.

**प्रमुख पुरस्कार व सन्मान :**

- महाराष्ट्र शासन, पं. भीमसेन जोशी युवा गायक पुरस्कार (२०२५)
- डॉ.गंगूबाई हंगल गुरुकुलची ४ वर्षांची फेलोशिप (स्कॉलरशिप).
- डॉ.वसंतराव देशपांडे युवा पुरस्कार.
- खयाल गायकीतील उत्कृष्टतेसाठी कुसुमाग्रज युवा पुरस्कार.
- पुणे गंधर्व महाविद्यालयाचा पं. रामकृष्णबुवा वझे पुरस्कार.

**प्रमुख संगीत महोत्सव व सादरीकरण :**

- पं. भीमसेन जोशी महोत्सव
- पं. राम मराठे स्मृती समारोह
- NCPA व IIT चेन्नई आयोजित 'आदि अनंत' फेस्टिव्हल
- डॉ. वसंतराव देशपांडे संगीत महोत्सव
- बांद्रा संगीत सभा
- पं. विष्णू दिगंबर फेस्टिव्हल,
- दिल्ली विरासत म्युझिक फेस्टिव्हल,
- डेहराडून-कोलकाता म्युझिक कॉन्फरन्स (चौधरी हाऊस) तानसेन समारोह,
- ग्वाल्हेर हृदयेश आर्ट्स फेस्टिव्हल, मुंबई

**संगीत नाटक क्षेत्रात योगदान :** पं. राम मराठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून भाग्येश यांनी त्यांच्या आजोबांचे प्रसिद्ध संगीत नाटक ''संगीत मंदारमाला'' मध्ये 'मंदार' ही मुख्य भूमिका साकारली आहे. या भूमिकेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातील संगीतप्रेमींकडून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

**-स्वागतोत्सुक-**

**अध्यक्ष, विश्वस्त, कार्यकारी मंडळ, चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक.**

# श्री महा अष्टमी उत्सव



सालाबाद प्रमाणे याही वर्षी शारदीय नवरात्रनिमित्त अष्टमी उत्सव चित्तपावन संस्थेतर्फे करण्यात येत आहे. श्री महालक्ष्मी अष्टमी उत्सव या वर्षी रविवार दि. १८ ऑक्टोबर रोजी संपन्न होत आहे.. ज्यांची पूजेची वर्षे आहेत त्यांनी आपली नावे संस्थेच्या ऑफिसमध्ये किंवा सौ. सुवर्णा सहस्त्रबुद्धे यांच्याकडे नोंदणी करून रु. ४००/– भरावेत. तसेच ज्यांना प्रसाद भोजनासाठी लाभ घ्यायचा असेल त्यांनीही आपली नावे ऑफिसमध्ये किंवा सौ. सुवर्णा सहस्त्रबुद्धे यांच्याकडे रुपये ४०० देऊन नोंदणी करावी. आयत्या वेळेस येणाऱ्यांना कुपन दिले जाणार नाही.

**पूजेची वेळ –** सकाळी दहा वाजता.

**पूजेसाठी आणावयाचे साहित्य –** हळदी कुंकू, ताम्हण, पळी भांडे, निरंजन व त्यात घालण्यासाठी तूप वात, उगाळलेले चंदन, कापूर कापूरदाणीसह, उदबत्ती, काडेपेटी, दहा विड्याची पाने, दहा सुपाऱ्या, खारीक, बदाम, प्रत्येकी पाच, फळे पाच, दोन नारळ, सुट्टे पैसे, दुर्वांच्या दोन जुड्या, गूळ खोबरे, जानवी जोड, कापसाची वस्त्रे दोन, अक्षता, दूध साखरेचा नैवेद्य, अत्तर, काजळ डबी, दुर्वांचा अखंड १६ पेरांचा तातू, न मिळाल्यास दोन–तीन जुड्या दुर्वांच्या आणाव्यात.

**पूजेसाठी लागणारी पत्री–** आघाडा, दुर्वा, धोत्रा, बेल, चाफा, शेवंती, केवडा, आंबा, बोर, बकुळ, प्राजक्त, तुळस, मालती, अशोक, हादगा, माका, शमी, रुई, कण्हेरी, यापैकी शक्य असतील तीच पत्री आणावीत. बाजारात विकत मिळणारी पत्री किंवा माहीत नसलेली पत्री आणू नयेत. दुर्वांचा तातू सोळा पेराचा असावा. रेशमाचा तातू व पंचामृत, खडे संस्थेतून मिळतील.

**सूचना –** पूजेसाठी येताना पारंपारिक वेष परिधान केलेला असावा. हातामध्ये काचेच्या बांगड्या, कपाळाला कुंकू असावे. केस बांधलेले असावेत. आपले पूजेचे साहित्य स्वच्छ व चांगल्या प्रतीचे असावे. पूजेसाठी मिळणाऱ्या छोट्या सुपाऱ्या आणू नयेत. फळे दोन आणली तरी चालतील पण ती खाण्याजोगी असावीत. जे आपण स्वतः खातो ते देवाला द्यावे. ज्यांच्या पूजेची पाच वर्षे पूर्ण झाली असतील त्यांनी उद्यापनासाठी वायनदान आणावे. त्यामध्ये नवेकोरे सूप, खण, नारळ, ओटीचे सामान, कंगवा, करंडा, बांगड्या, गळसरी, ओटीसाठी तांदूळ, नारळ, सुपारी, विडा दक्षिणा, म्हणजे सौभाग्यवायन असावे. संध्याकाळची दर्शनाची वेळ साडेसातच्या नंतर सुरू होईल. संध्याकाळी दर्शनाला येताना पारंपारिक वेश असावा. काळे कपडे घालू नयेत. अष्टमीच्या श्री महालक्ष्मी मुखवट्यासाठी तांदूळ, साडी, प्रसाद, फुलांचा साज इ. आणि उत्सवासाठी देणगी देऊ इच्छिणाऱ्यांनी आपले नावे व रोख रक्कम संस्थेच्या ऑफिसमध्ये देऊन रितसर पावती घ्यावी. जमलेल्या देणगीतूनच संस्थेमार्फत त्याचा विनियोग केला जाईल.

अष्टमी पूजेसाठी व प्रसादासाठी नाव नोंदणी व शुल्क ऑनलाइन भरण्यासाठी खालील प्रमाणे संपर्क साधावा.

सौ. सुवर्णा सहस्त्रबुद्धे : मोबाईल : ९४२२९४२७०४

अथवा – ऑफिस श्री परशुराम भवन

संपर्क–०२५३/२५७६२४१. मोबा.: ८३२९८९६८७८

ऑफिसची वेळ – सकाळी १० ते २ सायंकाळी ४ ते ७


पूजेची वेळ – सकाळी दहा वाजता

दर्शनाची वेळ – सायंकाळी साडेसात नंतर

नेहमीप्रमाणे ऑनलाइन दर्शनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## श्री महा अष्टमी स्टॉल बुकिंग


**अष्टमीच्या उत्सवात आपण आपल्या ज्ञाती–बाधवांसाठी स्टॉल उपलब्ध करून देतो. मधल्या काळात नवीन वास्तू बांधणीमुळे खंड पडला होता. या वर्षी सभासदांसाठी स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रथम नाव नोंदवून पैसे भरणाऱ्यांना प्रथम संधी दिली जाईल. त्यासाठी ५००/– रु. आकारण्यात येत आहेत. ज्यांना स्टॉल लावायचे असतील त्यांनी आपली नावे संस्थेच्या कार्यालयात अथवा मैथिली गोखले यांच्याकडे ऑनलाइन पैसे भरून नोंदवावी.**



**संस्थेचा संपर्क : ०२५३–२५७६२४१. मोबा.: +९१ ९५१८३७८५७७**

**मैथिली गोखले : +९१ ९८२२५६४०२४**

**प्रथम येणाऱ्यांना प्रथम संधी...**



# स्नेहबंध चा हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात संपन्न




शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी स्नेहबंध चे, श्रावणी शुक्रवारचे हळदीकुंकू उत्साहात पार पडले. आपल्या परंपरेनुसार, श्रावणातील शुक्रवारी ''जीवती'' च्या प्रतिमेची पूजा करतात.

हिंदू संस्कृती जपण्यासाठी व महिलांना एकत्रित येण्यासाठी ''स्नेहबंध'' नेहमीच प्रयत्नशील असतो. प्रथम ''जीवती''च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर गूळ फुटाणे व दुधाचा नैवेद्य अर्पण करून सर्व मैत्रिणींनी ''गणपतीची'', ''जिवतीची'' आरती म्हटली. तत्पूर्वी सर्वांचे सामूहिक ''श्री सूक्त'' पठण झाले .

या कार्यक्रमाचे अजून एक वैशिष्ट्य, म्हणजे ''जरा हटके'' अशा स्पर्धा घेण्यात आल्या १) जास्तीत जास्त एकाक्षरी अर्थपूर्ण शब्द लिहिणे. २) एकाच शब्दाचे दोन अर्थ असलेले शब्द लिहिणे. स्पर्धेसाठी पंधरा मिनिटे व दहा मिनिटे, अशी वेळ देण्यात आली होती. स्पर्धेचे परीक्षण सुरू असतानाच मधल्या वेळेत उपस्थित मैत्रिणींचा उखाणे घेण्याचा कार्यक्रमही छानच रंगला. या उखाण्यांनी कार्यक्रमाची रंगत फारच वाढवली. त्यानंतर सर्वांना हळदीकुंकू, अत्तर, गूळ, फुटाणे व दूध देण्यात आले. पहिल्या स्पर्धेच्या विजेत्या प्रिया मराठे (प्रथम) रजनी गोगटे (द्वितीय) तर दुसऱ्या स्पर्धेच्या विजेत्या स्नेहा महाबळ (प्रथम) तर निशिगंधा घाणेकर (द्वितीय) होत्या.

या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या आपल्या दोन ज्येष्ठ मैत्रिणी साठे ताई व केळकर ताई यांच्या हस्ते विजेत्या मैत्रिणींना बक्षिसे देण्यात आली. सर्व विजेत्या मैत्रिणींचे ''मनःपूर्वक अभिनंदन''! ''स्नेहबंध'' च्या सर्व मैत्रिणींच्या सहकार्याने, हा कार्यक्रम छानच झाला. अनेक जणींनी आपल्या ''व्हाट्सअप ग्रुप''वर तसेच प्रत्यक्ष भेटीतही कार्यक्रमाचे खूप कौतुक केले.

या कार्यक्रमासाठी ४० मैत्रिणी उपस्थित होत्या. आता लवकरच ''गणेशोत्सवात भेटूया''

***

## अभिनंदन...



– पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यात चि. सार्थक अजित गोखले यास शिष्यवृत्ती मिळालेली असून, त्याचा ४६वा जिल्हास्तरीय क्रमांक आलेला आहे. तसेच शंकराचार्य न्यासातर्फे आयोजित संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत तृतीय त्याला क्रमांक मिळाला आहे. दोन हजार रुपये चेक व ट्रॉफी मिळाले आहे. चि. सार्थक याचे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा

# ज्येष्ठांच्या मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत चित्तपावन चमू ची जोरदार कामगिरी

पुणे येथे दि. २१ ऑगस्ट २०२६ ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत अखिल भारतीय पातळीवर झालेल्या ज्येष्ठांच्या 'Master's Badminton' स्पर्धेत नाशिकच्या 'चित्तपावन चमू' ने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत निरनिराळ्या गटात मिळून ४ सुवर्ण व ३ रजत पदके प्राप्त केली आहेत.

त्या बद्दल संस्थेतर्फे त्यांचे अभिनंदन व क्रीडा क्षेत्रातील यापुढील नेत्रदीपक वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा.

***

# नाशिकचा रविवार कारंजा - एक अखंड प्रवाही चैतन्यदायी उर्जास्त्रोत (लेखांक-३)




आता आमच्या गल्लीच्या प्रवेश स्थानी रविवार कारंजावर अर्धवट पाडलेल्या जेलमध्ये प्रवेश करण्यापूर्वी आमचे 'गल्ली महात्म्य' थोडक्यात ऐकवतो.

नाशकातल्या तेव्हाच्या नगरपालिकेने घर नंबर द्यायला सुरुवात केली तीच मुळी गल्लीच्या एका टोकाशी असलेल्या पेठे विद्यालयापासून. आमच्या शाळेचा घर नंबर १. १९ व्या शतकात तेथे कोर्ट होतं त्या वेळी काही काळ न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. (त्यावेळचा एक ऐकीव किस्सा पुन्हा केव्हातरी).

पेठे विद्यालयाला खेटून असलेल्या बेळे वाड्यातच इंदिरा गांधींचे त्यावेळचे निष्ठावंत खासदार, केंद्रीय मंत्री वसंतराव साठे यांचा जन्म झालेला. कारण त्यांच्या आईचे वडील म्हणजे त्यांचे आजोबा (बहुतेक भावे वा भिडे) हे शासकीय सेवेत असताना बेळे वाड्यात वास्तव्यास होते व तेव्हाच्या प्रथेप्रमाणे मुलगी, म्हणजे वसंतराव साठे यांची आई ही प्रसुतीसाठी माहेरी आलेली.

वसंतराव साठे निवर्तण्यापूर्वी, काही वर्षे आधी केंद्रीय मंत्री असताना नाशिक दौऱ्यावर आले होते. त्यावेळी एका सकाळी गल्लीत एकाएकी नगरपालिकेची सफाई मोहीम सुरू झाली. पोलीस बंदोबस्त लागला. काय झाले? विचारता समजले की वसंतराव साठे त्यांच्या जन्म स्थळाला भेट द्यायला येणार आहेत. तोपर्यंत वसंतराव साठे यांचा जन्म आपल्या गल्लीतला आहे याचा गल्लीवासियांना काही पत्ताच नव्हता. वसंतराव साठे त्यांच्या सर्व तामझामासह गल्लीत व बेळे वाड्यात प्रवेश करते झाले. त्यांनी त्यांचा जन्म झालेल्या खोलीस भेट दिली, तेव्हा त्यांना गहिवरून आले. बेळे कुटुंबीयांनीही त्यांचे यथायोग्य आगत स्वागत व आदर सत्कार करून त्यांना निरोप दिला.

याच बेळे वाडयात दत्त संप्रदायातले एक थोर साधक, अक्कलकोट स्वामींचे अनुग्रहीत व दिंडोरीचे बाबा मोरे यांचे श्रद्धास्थान असलेले पिठले महाराज आपले एक समवयस्क सहाध्यायी भागवत यांच्यासह दर्शनी भागात पहिल्या मजल्यावर अनेक वर्षे राहात असत. सध्या त्याच जागी ॲड. संजय बेळे यांचे वास्तव्य आहे. अध्यात्म क्षेत्रातील येवढे मोठे अधिकारी पुरुष आपल्या गल्लीत राहतात याची गल्लीच काय पण बहुतेक वाडा वासियांनाही तेव्हा कल्पना नसावी. पण त्यांच्या गूढ व्यक्तिमत्वाचे तेव्हाही एक सुप्त आकर्षण होतेच.

आमच्या गल्लीत आम्हा पोराटोरांचे गल्ली क्रिकेट किंवा आबा धोबी, लिंगोरचा चाले. तेव्हा दोन-तीनदा हमखास बॉल त्यांच्या खिडकी बाहेरील पत्र्यावर जात असे. मात्र त्यांच्या साधनेत व्यत्यय येत असल्याचे सांगून त्यांनी आम्हाला कधीही दटावले नाही, तर ते काठीने बॉल खाली ढकलून देत असत.

नाशकातले प्रसिद्ध द्राक्षवाले भिंगे वडनेर भैरव येथून येऊन प्रथम येथेच स्थिरावले. बेळे कुटुंबीयातील नाटककार विवेक बेळे, पेटंट सल्लागार प्रा. मृदुला बेळे, उद्योजक धनंजय बेळे, बुद्धिबळपटू विनय बेळे CA, गायिका मधुरा बेळे तसेच बेळे यांची भाची वंदना अत्रे हे सर्वजण आपापली क्षेत्रे गाजवीत आहेत. (अति विस्ताराच्या भयापोटी इतर कर्तृत्ववान बेळे कुटुंबीयांची नावे यात समाविष्ट करता आली नाहीत. क्षमस्व)

बेळ्यांच्या समोरच्या व आमच्या शेजारच्या मोघे वाड्यात राहात होता. बहुआयामी व्यक्तिमत्व लाभलेला उत्कृष्ट लेखक, वक्ता व संघटक असलेला, तसेच नाशकातल्या ग्राहक चळवळीचा संस्थापक व सध्या सावाना, पेठे विद्यालय व नासिक एज्युकेशन सोसायटी तसेच चित्तपावन ब्राह्मण संघ या सर्व संस्थांचा कर्ताधर्ता असलेला माझा बालमित्र प्रा. दिलीप फडके.

सावानाच्या नाट्यगृहाला त्याकाळी ज्यांनी रु. ७५,०००/- ची देणगी दिली व त्यामुळे ज्यांच्या वडीलांचे म्हणजे परशुराम सायखेडकर यांचे नाव नाट्यगृहाला देण्यात आले त्या सायखेडकर यांचा लोखंडी खुर्च्या, टेबले भाड्याने देण्याचा व्यवसाय त्यावेळी आमच्या वाड्यात तळमजल्यावर भाड्याने घेतलेल्या कोठ्यात चाले. (तेव्हा स्वतःचीच बैठक व्यवस्था असलेले नाट्यगृह अथवा मोठा सभागृह नाशकात नव्हते. पेठे विद्यालय, रुंग्ठा विद्यालय,

जॅक्सन गार्डन शेजारील खुले नाट्यगृह येथेच भाड्याने स्टीलच्या फोल्डींग खुर्च्या घेऊन आसन व्यवस्था करण्यात येई) सायखेडकर हे अविवाहित होते व दिवसभर ते कोठ्याबाहेरील ओट्यावर खुर्ची टाकून देखरेख करीत असत व दोन पेंटर्सचे गल्लीत सतत खुर्च्यांना रंग द्यायचे काम चाले. आमचा गल्लीत खेळ चाले तेव्हा केव्हातरी हमखास चेंडू रंगाच्या डब्यास लागून डबा उलटा होऊन रंग सांडायचा व सायखेडकर यांनी रुद्रावतार धारण करण्यापूर्वी आमची पांगापांग होई.

त्या जागेत नंतरच्या काळात माझे काका, पेठे विद्यालयातील विद्यार्थीप्रिय शिक्षक रामभाऊ रानडे सर, यांची दुपारच्या वेळेत अभ्यागतांना भेटण्याची बैठक असे. काकांना विशिष्ट सिद्धी प्राप्त असल्याने त्यांच्याकडे आपले भविष्य जाणून घेण्यासाठी आलेल्यांचे ते तंतोतंत भविष्य सांगून समाधान करीत.

गल्लीच्या टोकाशी, आमच्या घरासमोर जेलला खेटून असलेल्या परदेशी वाड्यात पहिल्या मजल्यावर 'जाधव काळे' या हिरालाल गल्लीतल्या तेव्हाच्या आघाडीच्या आर्किटेक्ट फर्मचे वसंतराव जाधव हे सहृदय व्यक्तिमत्व आपल्या कुटुंबीयांसह वास्तव्यास होते. गल्लीतील गणेशोत्सव साजरा करताना त्यांचे आम्हाला मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य असे.

तर अशी ही रविवार कारंजावरील आमच्या गल्लीतील त्या काळची एक एक आगळी वेगळी रत्ने....

**लेखक – प्रमोद प्र. रानडे**

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# देणगीदार - ऑगस्ट २०२६

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री. मंगेश वामन दांडेकर | २,५००/- |
| ०२ | वैदिक ज्ञान विज्ञान संस्कृत महाविद्यालय | ७,००,०००/- |



## भावपूर्ण श्रद्धांजली...

– डॉ. अभय नामजोशी यांचे शनिवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२६ रोजी वयाच्या ६३व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. डॉ. अभय नामजोशी यांनी गेली ४० वर्षे दंतवैद्य म्हणून नाशिक रोड येथील बिटको पॉईंट येथे आपली वैद्यकीय सेवा बजावली. एकलहरे येथे त्यांचे बालपण गेले. त्यांनी मुंबई येथील शासकीय दंत महाविद्यालयातून (Government Dental College, Mumbai) दंतवैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. आपल्या प्रदीर्घ सेवेतून त्यांनी अनेक रुग्णांना उपचार व आधार दिला. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी तसेच असंख्य रुग्णांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो. संस्थेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



## भावपूर्ण श्रद्धांजली...

– अनंत दत्तात्रय मराठे यांचे दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. ते भारतीय रेल्वे चे सेवानिवृत्त कर्मचारी होते. त्यांच्या मागे दोन मुले, सुना, नाती असा परिवार आहे. नाशिक येथील व्यावसायिक श्री. संजय व संतोष मराठे यांचे ते वडील होते. संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

## –: आवाहन :–

**आपला चित्तपावन मित्र चा अंक अधिक समृद्ध करण्याच्या दृष्टीने सभासदांपैकी कोणालाही काही माहितीयुक्त लेख द्यायचा असेल तर त्यांनी तो ९८७०६४७१७९ (नितीन सहस्रबुद्धे) या नंबर वर व्हॉट्सअप करावा, योग्य लेख जागेच्या उपलब्धतेनुसार अंकात प्रसिद्ध करण्यात येतील. लेख मराठीमध्ये असावा.**

## ‘स्नेहबंध मैत्रिणींचा’ - हळदी कुंकू कार्यक्रमाची क्षणचित्रे...








ज्येष्ठांच्या मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत चित्तपावन चमू ची जोरदार कामगिरी

डावीकडून : सौ.सुलभा आपटे, सौ.आरती वैद्य, श्री.राज सिंह (आयोजक), श्री.संजय दीक्षित, श्री.प्रमोद रानडे


# श्री गणेशोत्सव - २०२६



**सोमवार १४ सप्टेंबर २०२६ रोजी**
**श्री गणेश प्रतिष्ठापना सकाळी १० वा**
**श्री अथर्वशीर्ष पठण सायंकाळी ६ वाजता**

**शनिवार १९ सप्टेंबर २०२६ रोजी**
**श्री गणेश विसर्जन**

**वरील सर्व कार्यक्रम**
**श्री परशुराम भवन येथे होतील.**




चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, स्टेट बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति, ______________________________

______________________________

______________________________

## संस्थेची वेबसाईट :-

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.